**प्रेसनोट** **दिनांक ०६/०१/२०२४**

## घरफोडीच्या गुन्हयातील आरोपीतांना अटक करुन मालमत्ता हस्तगत केलेबाबत.

ओशिवरा पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक २४/१२/२३ रोजी फिर्यादी नामे श्री. केनेली हरिषकुमार दोषी यांची बहिण राहत असलेल्या ए क्लेट बिल्डींग, यमुनानगर, लोखंडवाला, अंधरी पश्चिम, मुंबई येथील घरामध्ये कोणीतरी अज्ञात इसमाने अनधिकृतरित्या प्रवेश करुन सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केली आहे, अशी फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन दिनांक २६/१२/२३ रोजी ओशिवरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२९५/२०२३, कलम ४५४, ३८०, ५११ भा.द.वि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या आजपावेतो केलेल्या तपासावरुन सदरचा गुन्हा हा आरोपी १) मारुष मोहन मोटवानी वय ३९ वर्षे व २) प्रदिप नदूमल कुकरेजा वय ३६ वर्षे यांनी केला असल्याचे निष्पन झालेने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेलेली मालमत्ता १) ५०.०१० ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीट किमंत रु. ३.१२,५६२/- २ ) ३१९.६१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत रुपये १९,१७,६६०/- ३) ११००.५०० ग्रॅम वजनाचे चांदीच्या वस्तु किंमत रुपये ७७,०३५/- ४) ८२६.३७ ग्रॅम वजनाच्या सोने व चांदीचा मुलामा दिलेल्या वस्तु एकुण किंमत रुपये - ८,२५३/- असे एकूण २३,१५,५१० /- किंमतीचे दागिने व रोख रक्कम रु.२५,०००/- असे **एकूण रुपये २३,४०,५१०/- ची मालमत्ता हस्तगत** करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास चालू आहे.

ओशिवरा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि श्री. आनंद नागराळ, पोलीस हवालदार श्री. शैलेश शिंदे, श्री. विनोद माने, श्री. सिराज मुजावर, पोलीस शिपाई श्री. उमेश सोयंके, श्री. नवनाथ गिते, श्री. अमोल सुतार, श्री. किशोर बोबडे, श्री. गणेश बोराटे, व श्री. गणेश हंचनाळे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

--------oo-------